ऑफिस :– ०७१८४–२५५०९३, मु.अ.:– ०७१८४–२५२०८८, अध्यक्ष:– ०७१८४–२५१७२०

# कार्यालय नगर परिषद, भंडारा

नियम क्र.६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ आणि
महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये )

email- bhandaranagarpalika@gmail.com

क्रमांक:– नपभं/मुअं/बांध/ ९३० /२०१६ दिनांक :– २९ / ४ /२०१६

## बांधकाम परवाना मंजुरी (अधिकृत)

प्रती,

श्रीमती वसुधा वसंत पातुरकर,अनुप वसंत पातुरकर,सौ.श्रध्दा माधव रामेकर
रा.शिवाजी वार्ड,भंडारा

**विषय** :– बांधकाम परवाना मंजुरी ( अधिकृत ) देणेबाबत.

**सदर्भ** :– आपले अर्ज क्र.१२०२ दि.१२/०४/२०१६

## आदेश

आपण खालील ठिकानी महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती आणि औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४/६९ अन्वये विकास कार्य करण्यासाठी बांधकाम परवानगी मिळण्यासाठी या सोबतच्या नकाशास पात्र राहुन आपणास हे प्रांरभ प्रमाणपत्र म.प्रा.व.न.र.अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार हा बांधकाम परवाना वापरासाठी देण्यात येत आहे.

**बांधकाम तपशिल** : निवासी/वाणीज्य/सार्व.वापरासाठी.

## बांधकामाच्या जागेचे वर्णन

**मौजा:**– पिंगलाई गट क्रं.७५५/१, ख.क्रं.६४/१

**एकुण जागेचे क्षेत्रफळ** :– ३२३.२५ चौ.मी. व ३७६.६५ चौ.मी. असे एकुण ६९९.९० चौ.मी.

**बांधकामाचे क्षेत्रफळ** तळ मजला,पार्कींग एरीया :– ४५.४२ चौ.मी.शहर :– भंडारा खास

अप्पर ग्राउंड फ्लोअर :– ३३६.६५ चौ.मी.
प्रथम मजला :– ३३६.६५ चौ.मी.
दुसरा मजला :– ३३६.६५ चौ.मी.
तिसरा मजला :– ३३६.६५ चौ.मी.

### शर्ती व अटी,

१). सदरील परवानगी ही सोबतच्या नकाशाप्रमाणे बांधीव क्षेत्रापुरतीच मर्यादीत राहील.मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम नसल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६चे कलम ५२ व ५३ अन्वये आपणावर कार्यवाही करण्यात येऊन बाधकाम परवानगी रद्द करण्यात येईल.

२) सदरील बांधकाम परवानगी आदेशाचे तारखेपासुन एक वर्षापर्यत वैध राहील.

३) नकाशात दर्शविल्याप्रमाणे सोडण्यात आलेल्या खुल्या समासाच्या जागेतुन सांडपाणी निचरा करण्याची रितसर व्यवस्था व्यक्तीश: जवाबदारी आपली राहील.

४) सदरील बांधकाम करतांना नगर परिषदेकडे पंजीबध्द तांत्रीक तज्ञामार्फत व त्यांचे मार्गदर्शनाखाली काम पुर्ण करावे.

५) इमारतीचे बाधकाम पुर्ण झाल्यानंतर नगर परिषदेकडून पुर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त केल्यावरच इमारत उपयोगात आणावी, तसेच नगर परिषदेकडून वापर प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे.

६) इमारत बांधकामाकरीता क्लें फ्लाय अॅश/सिमेंट फ्लाय अॅश विटा,ब्लॉक्स,टाईल्स चा वापर करावा.

७) सडासाचे बांधकाम करतांना सेंफ्टीक टॅकचे बांधकाम सिमेंट कॉक्रीटचे असणे आवश्यक राहील व आऊटलेट पाईप नगर परिषदेच्या सार्वजनिक नालीला जोडण्यात यावे.

८) बाधकामाच्या आवारात कमीत कमी १० वृक्षाची लागवड करावी.

९) बांधकाम सुरू करण्यापुर्वी सदर जागेवर मंजुरीचा क्रमांक व दिनांक तसेच मंजुरीचा कालावधी व इमारत मालकाचे नाव याबाबतचे बोर्ड लावावे.

१०) बाधकाम सुरू करण्यापुर्वी संपुर्ण जागेचा पुनश्च मोजनी करून नकाशाप्रमाणे सामासीक अंतर सोडूनच बांधकामास सुरवात करावी.

११) महाराष्ट्र शासन निर्णयाप्रमाणे पावसाच्या पाण्याची साठवणूक नकाशात दर्शविल्याप्रमाणे रूफ टॉप रेन वॉटर हार्वेस्टिग पध्दतीने करावी.

१२) मजुर नकाशाप्रमाणे बांधकाम नसल्यास किंवा तक्रारयुक्त बांधकाम असल्यास किंवा विकास योजना बाधीत होत असल्यास सदरील परवानगी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५९ अन्वये रद्द करण्यात येईल.

१३) विशेष शासनाचे निर्देशाप्रमाणे सौरउर्जा संयंत्र बसविणे बंधनकारक राहील.

१४) इमारतीचे बांधकाम भुकंप रोधक तांत्रीक क्षमतेनुसार असावे.

१५) अग्नीशामन प्रतिबंधक कायद्यानुसार इमारतीचे बांधकाम असावे.

१६) याद्वारे आपणास बांधकाम परवानगी देण्यात येत असली तरी या जागेवरील आपला मालकी हक्क याद्वारे प्रमाणीत होत नाही.तसेच सदर्हु बांधकाम परवानगी आपण सादर केलेल्या दस्ताऐवजाचे आधारे देण्यात येत असुन दस्ताएवज चुकीचे असल्यास याची जबाबदारी न.प. प्रशासनाची राहणार नाही व सदर्हु परवानगी रद्द समजण्यात येईल.

१७ ) पार्कीगचे जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यात येऊ नये.

**सहपत्र** :– मंजुर नकाशाप्रमाणे दोन प्रती.

कार्यालय नगर परिषद भंडारा

मुख्य अधिकारी
नगर परिषद, भंडारा

**प्रतिलीपी,**

कर अधिक्षक, कर विभाग, नगर परिषद, भंडारा.

मुख्य अधिकारी
नगर परिषद, भंडारा